एका 'अलबेल्या' चमत्काराची गोष्ट!

चमत्कार हे वारंवार होत नसतात म्हणूनच त्यांचे महत्त्व मोठे असते. एखादा चमत्कार माणसाला चिरंजीव करून जातो, त्या चमत्कारामुळे त्याचे आयुष्य उजळून जाते तरी ती व्यक्ती मात्र पुन्हा कधी तरी चमत्कार घडेल यासाठी आतुरतेने वाट पाहात असते. मास्टर भगवान ऊर्फ भगवानदादा यांच्या आयुष्यात 'अलबेला' नामक चमत्कार घडला. त्या 'अलबेला'तील गाण्यांची लोकप्रियता आजही अबाधित आहे, भगवान यांनी त्यात साकारलेली नृत्यशैलीही अजरामर झाली आहे. 'अलबेला' घडून गेला. 'भोली सुरत दिल के खोटे'सारख्या शैलीदार नृत्य गीतापासून 'धीरे से आजा री अखियन में' या अवीट गोडीच्या अंगाईपर्यंतच्या मधुर स्मृती 'अलबेला'ने प्रेक्षकांच्या स्मरणरंजनाला देणगी म्हणून पुरवल्या. 'अलबेला'च्या यशात आणि याच स्मरणरंजनात उर्वरित आयुष्य काढलेल्या मास्टर भगवान यांनी 'श्याम ढली' म्हणत जगाचा निरोप घेतला तेव्हा सर्वांना आठवण झाली ती या चमत्काराचीच.

स्टंटपटांचा एक स्वतंत्र प्रेक्षक वर्ग आणि नटवर्गही एके काळी चित्रपटसृष्टीत होता. या नटांना लोकप्रियता असली तरी सामाजिक चित्रपटांच्या कलावंतांना जी प्रतिष्ठा व सन्मान मिळतो त्यात वाटेकरी होण्याचे भाग्य या नटांच्या नशिबी नव्हते. मास्टर भगवान यांच्या बरोबरीने स्टंटपटात काम केलेल्या बाबूराव पैलवान, वसंतराव पैलवान यांना इतिहासात अभिनेता म्हणून स्थान मिळाले नाही; केवळ 'चित्रपटात काम केले' अशीच त्यांची नोंद झाली. दारासिंग, जॉन कॉवस आणि असे इतर कितीतरी नट आहेत, ज्यांच्या स्टंटपटांनी तुफान धंदा केला; परंतु तरीही त्यांच्या कामगिरीचे सहज विस्मरण झाले. सामाजिक, कौटुंबिक चित्रपटांच्या मुख्य प्रवाहात यश मिळाल्याखेरीज प्रतिष्ठा, सन्मान आणि दीर्घजीवी लोकप्रियता मिळत नाही. 'अलबेला'च्या यशामुळे भगवानदादांना हे सर्व मिळाले. या केवळ एकाच चित्रपटाच्या बळावर भगवान यांचे नाव इतिहासात कायमचे नोंदविले जाईल हे सत्य असले तरी भगवान यांना 'अलबेला'च्या यशाची, दर्जाची पुनरावृत्ती करता आली नाही हेही तेवढेच खरे आहे. म्हणूनच 'अलबेला'च्या यशाला चमत्काराचे नाव द्यावे लागते.

'अलबेला'च्या बाबतीत सर्व काही जुळून आले होते. भगवान यांच्याकडे काही पारंपरिक नायकाचे व्यक्तिमत्त्व नव्हते. त्यामुळे स्टंटपटांच्या बाहेर जाऊन त्यांनी अभिनय करायचे ठरवलेच असते तर त्यांना विनोदी अभिनेत्याच्या व्यक्तिरेखाच मिळाल्या असत्या. कारकीर्दीच्या उत्तरार्धात त्यांनी याच प्रकारच्या भूमिका केल्यासुद्धा. परंतु 'अलबेला'चा नायक म्हणून त्यांना प्रेक्षकांनी मनापासूनच स्वीकारले. 'बडा आदमी' होण्यासाठी घराबाहेर पडलेला आणि नाच-गाण्यांचा शौकीन असलेला एक भोळाभाबडा युवक म्हणून त्यांनी या चित्रपटात चांगली छाप पाडली. सी. रामचंद्र यांनी या चित्रपटाला दिलेले संगीत, भगवानदादांनी या चित्रपटापासून स्थापित केलेली एक स्वतंत्र नृत्यशैली हा इतिहास सर्वश्रुत आहे. गतीपेक्षा नजाकतीला अधिक महत्त्व देणारी आणि एका संथ लयीत कमरेला लचके देण्याची ही नृत्यशैली भगवान यांच्या ठेंगण्या व जाडसर शरीरयष्टीमुळे अधिकच मजेदार वाटत असे. भगवान यांच्या अगदी उलट व्यक्तिमत्त्व असलेल्या सुपरस्टार अमिताभ बच्चन यांनी या शैलीची नक्कल करावी, असा सल्ला डान्स मास्टर कमल यांनी दिला तेव्हा अमिताभही आश्चर्यचकित झाला होता; परंतु 'मच गया शोर सारी नगरी रे'सारख्या गाण्यात अमिताभने भगवान यांच्या नृत्यशैलीची केलेली झकास नक्कल प्रेक्षकांनी उचलून धरली. अमिताभच्या अनेक नृत्यांमध्ये भगवान यांचा हा प्रभाव जाणवतो. 'अलबेला'चा प्रेक्षकांवरील प्रभाव आणि कालातीत मनोरंजनमूल्याचा पुरावा १९७५ साली मिळाला. हा चित्रपट या वर्षी दुसऱ्यांदा प्रदर्शित करण्यात आला आणि तेव्हाही त्याने रौप्य महोत्सवी यश मिळविले. दुर्दैवाने आर्थिक अडचणींमुळे भगवानदादांनी या चित्रपटाचे हक्क रणजित बुधकर यांना विकले होते, त्यामुळे या यशाचा आर्थिक फायदा भगवानदादांना मिळू शकला नाही.

दादांच्या स्टंटपटांनी त्यांना दिलीपकुमार, नौशाद, ओमप्रकाश यांच्यासारखे मित्र मिळवून दिले. दादांच्या चित्रपटांना 'अण्णासाहेब' या नावाने संगीत देणारे संगीतकार सी. रामचंद्र हे तर त्यांचे खास मित्र. रात्री-अपरात्री अण्णांनी दादांचे दार ठोठवावे , 'भगू चलो' म्हणावे आणि कुठे, कशाला, याची अजिबात चौकशी न करता दादांनी त्यांच्यासोबत जावे हे नेहमीचेच. नौशाद यांनी भगवानदादांच्या दोन स्टंटपटांच्या प्रिंट विकत घेतल्या होत्या. कंटाळा येऊ लागला की ते घरच्या प्रोजेक्टरवर हे चित्रपट पाहत आणि मनमुराद हसत. दिलीपकुमार, नौशाद, भगवानदादा, गीतकार राजेंद्र कृष्ण ही चौकडी अनेकदा मध्यरात्री मुंबईतील मरीन ड्राइव्हवर फिरायला जात असे. कोणी तरी एकदा याबाबत छेडले असता भगवानदादा म्हणाले, 'तिथून चंद्र अगदी जवळ दिसतो तो बघायला आम्ही जात असतो.' हिंदी चित्रपटसृष्टीतले यश हे चंद्रासारखेच असते. ते समोरच आहे असे वाटते; परंतु हाती येत नाही. एकदा सामाजिक चित्रपटाकडे मोर्चा वळविला आणि 'अलबेला' यशस्वी ठरल्यावर भगवानदादांची महत्त्वाकांक्षा वाढली आणि त्यांनी आणखी काही सामाजिक चित्रपटांची निर्मिती केली; परंतु यशाची पुनरावृत्ती झाली नाही. मग दादांनी पुन्हा स्टंटपटांची निर्मिती केली परंतु काळ बदलला होता. त्यातच त्यांचे सी. रामचंद्र यांच्याशी भांडण झाले. गोरेगाव येथील गोडाऊनला आग लागून 'अलबेला' वगळता इतर सर्व चित्रपटांच्या निगेटिव्हज् जळून खाक झाल्या. पुढे तर हळूहळू 'स्टंट', 'सोशल' असे चित्रपटांचे सर्व प्रकार आणि प्रवाह एकत्रच आले. प्रतिष्ठा, श्रीमंती, ऐट, प्रसिद्धी असे सर्व काही वाट्याला येऊनही ज्यांना व्यवहार कळला नाही, पैसा सांभाळता आला नाही, असे असंख्य अभिनेते उदाहरणादाखल सांगता येतील. भगवानदादांनी उत्तरायुष्यात चरित्र भूमिका करीत काढलेले दिवस याच प्रकारचे होते. अभिनेता म्हणून भगवानदादांचे कर्तृत्व मर्यादितच होते. त्यामुळे 'अलबेला' शैलीत गाण्यावर कंबर हलविण्याची एखादी छोटीसी भूमिका बहुधा भगवानदादा यांच्या वाट्याला येई. त्यांच्या पडद्यावरील या मिनीटभराच्या दर्शनातही शिट्या-टाळ्यांचा प्रतिसाद हमखास मिळत असे, हीच त्यांची मोठी कमाई म्हणावी लागेल. बेंजोच्या तालावर 'अलबेला'तील 'नाम बडे और दर्शन छोटे' या गाण्यावर रस्त्यात नाचणारी तरुणांची पिढी दादांनी चाळीतील आपल्या खोलीच्या खिडकीतून पाहिली. कारण अलीकडे त्यांचे पाय अधू झाले होते. याच पायांच्या आणि शरीराच्या नजाकतदार लयबद्ध हालचालीतून साकारलेली नृत्ये वारंवार टीव्हीच्या पडद्यावर पाहताना दादांनाही हाच प्रश्न पडला असेल, 'अलबेला' नावाचा 'चमत्कार' आपल्याच आयुष्यात 'घडला होता का ?' या चमत्काराला सलाम!

■ श्रीकांत बोजेवार